## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर- ३६९३/२०२२

**अपिलार्थी, श्री.निलेश नारायण पाटोळे,**
घर क्र. ८१३, मु. नाणोरे, पो.बामणोली,
ता.माणगांव, जि.रायगड ४०२ १०४.

विरुध्द

जन माहिती अधिकारी, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),
काळ प्रकल्प क्र.२ माणगांव यांचे कार्यालय,
ता.माणगांव, जि.रायगड.

प्रथम अपीलीय प्राधिकारी, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),
काळ प्रकल्प क्र.२ माणगांव यांचे कार्यालय,
ता.माणगांव, जि.रायगड.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १६.१०..२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २९.०७.२०२२ | -- | ०६.०९.२०२२ | -- |

अपिलार्थी यांनी दि. २६.१२.२०२२ रोजीच्या अर्जान्वये *" जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांनी माहिती विहित मुदतीत पुरविली नाही. "*असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १६.१०.२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी डॉ.दीपा भोसले, उप जिल्हाधिकारी भूसंपादन काळ प्रकल्प क्र.२ माणगाव उपस्थित आहेत. तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

1) *मौजे नाणोरे गावाची कालव्यासाठी भूसंपादन जमिनी झालेल्या जमिनीचा मुल्यांकन रजिस्टरची माहिती सत्यप्रती करुन मिळणेबाबत.*
2) *मौजे नाणोरे गावाची कालव्यासाठी भूसंपादन झालेल्या जमिनीचे घेतलेले ७/१२ उतारे सत्यप्रती करुन मिळणेबाबत.*
3) *मौजे-नाणोरे गावाची भूसंपादन कालव्याचा पाठवलेला वरीष्ठ कार्यालयाला नोंदणीकृत नोंदवहीमधील पाठवलेला रिपोर्ट व जमिनीचा चौकशी अहवाल व तक्रार नोंदवही मधील माहिती सत्यप्रती करुन मिळणेबाबत. "*

सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी असे निवेदन केले की, त्यांना चुकीची माहिती देण्यात आलेली आहे.

प्रथम अपिलीय प्राधिकारी डॉ.दीपा भोसले, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) यांनी असा युक्तीवाद केला की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही खूप जुनी असल्याने ती जीर्ण झालेली आहे. तरी त्याचा शोध घेऊन, अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती देण्याचा प्रयत्न करण्यात येईल. मौजे नाणोरे येथे कालवे बाधण्यासाठी ज्या जमिनीचे भूसंपादन केले असेल, त्याची सर्व कागदपत्रे, निवाडा व जमिनधारकांना दिलेला मोबदला यासंबंधीची कागदपत्रे अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात येतील असे आश्वासन डॉ.दीपा भोसले यांनी दिले. त्यांच्या या आश्वासनाची नोंद घेण्यात येत आहे.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांनी मागणी केलेली माहिती विनामुल्य पुरविणे योग्य होईल. तसेच माहिती पुरविल्याबाबतचा अहवाल उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) यांनी पुढील सुनावणीच्या वेळी सादर करणे योग्य होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

### आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) काळ प्रकल्प क्र.२, माणगांव यांनी **अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली संपूर्ण माहिती ३० दिवसात शिघ्र टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना ३० दिवसांत पाठवावे.

२. अपिलार्थी यांना माहिती पुरविल्याबाबतचा अहवाल विद्यमान प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), काळ प्रकल्प क्र.२, माणगांव यांनी पुढील सुनावणीच्या वेळी स्वत: उपस्थित राहून सादर करावा.

३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०३.१२.२०२५ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

सही/-

कोंकण भवन, **(शेखर चन्ने)**
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४. **राज्य माहिती आयुक्त,**
दिनांक : १६ ऑक्टोबर, २०२५ . **कोंकण खंडपीठ**

**अपिल क्रमांक : के.आर- ३६९३/२०२२**

**अपिलार्थी, श्री.निलेश नारायण पाटोळे,**

**सुनावणी दिनांक ३.१२.२०२५ ( In Continuation of order dt.१६.१०.२०२५)**

**विवेचन**

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. तथापि, जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

या प्रकरणी प्रथम अपिलिय अधिकारी डॉ. दिपा भोसले, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), काळ प्रकल्प क्र. २ माणगाव यांनी दि.२०.११.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे आयोगास लेखी अहवाल सादर केला आहे. सदर अहवालात त्यांनी असे नमूद केले आहे की, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने त्यांच्या कार्यालयाकडील कागदपत्रे पाहता सी. सी प्रत उपलब्ध आहे ती त्यांना उपलब्ध करून देण्यात येत आहे. तरी सोमवार दि.३.११.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता त्यांच्या कार्यालयात समक्ष उपस्थित राहणेकरीता कळविण्यात आले होते. तसेच तक्रार, ७/१२ च्या अनुषंगाने त्यांच्याकडे काही कागदपत्रे उपलब्ध असल्यास ती येताना घेऊन यावी की जेणेकरून त्यांना पाहिजे असलेली माहिती व त्यांच्या कार्यालयात उपलब्ध माहिती यांची सांगड घालून आवश्यक माहिती पुरविण्याबाबत कार्यवाही करता येईल अशा आशयाचे पत्र दि.२७.१०.२०२५ रोजी अपिलार्थी यांना व्हॉटसअपद्वारे पाठविण्यात आलेले होते. तथापि, दि.३.११.२०२५ रोजी ते अनुपस्थित राहिले आहेत. तदनंतर दि.१०.११.२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता त्यांच्या कार्यालयात उपस्थित रहावे अशा आशयाचे पत्र दिनांक ३.११.२०२५ रोजी स्पीड पोस्टाद्वारे त्यांना देण्यात आले आहे. तथापि, उक्त दिनांकास अपिलार्थी अनुपस्थित राहिले आहेत.

दि.१८.११.२०२५ रोजी त्यांच्या कार्यालयात अपिलार्थी यांनी उपस्थित राहून कागदपत्रांची मागणी केली. त्यावेळी त्यांच्या कार्यालयाकडील अभिलेखातील उपलब्ध कागदपत्रे दाखवण्यात आली असता त्यांनी टपालाने पाठविण्यात यावीत असे सांगितले आहे. आणि तसे अभ्यागतांच्या नोंदवहीमध्ये नमूद केलेले आहे.

त्यांच्या कार्यालयाकडील मौजे नाणोरे संपादन संचिकेतील उपलब्ध अभिलेखानुसार सी.सी., अवार्ड स्टेटमेंट ४४अ (पार्ट) यांच्या प्रती पुरविण्यात येत आहेत. या कार्यालयाकडील उपलब्ध अभिलेखातील उपलब्ध अभिलेखात एस. आर. ४४ अ नाणोरे बाबत अवार्ड स्टेटमेंट विनास्वाक्षरी दिसून येत आहे. त्यामुळे ते आपणास पुरविता येत नाही. आपण मागणी केलेले तक्रार रजिस्टर आणि संपादनातील ७/१२ अभिलेख दिसून येत नाहीत. अशा स्वरूपाचे पत्र क्र./३८१/भूसं/द्वितीय अपिल क्र.के. आर.३६९३/२०२२/२०२५ दि.२०.११.२०२५ या पत्राद्वारे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

प्रथम अपिलिय अधिकारी डॉ. दिपा भोसले, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),काळ प्रकल्प क्र. २ माणगाव यांचा हा अहवाल पाहता अपिलार्थी यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना दिलेली नाही. भूसंपादन झालेले ७/१२ उतारे उपलब्ध नाहीत हे मान्य करता येण्यासारखे नाही. तसेच मागणी केलेले तक्रार रजिस्टर उपलब्ध नाही ही बाबसुध्दा मान्य करता येणार नाही. सदरचा अभिलेख कायमस्वरूपी जतन करून ठेवावयाचा अभिलेख आहे. त्यामुळे हा अभिलेख उपलब्ध झाला नाही त्यामुळे या संदर्भात पुढे काय कार्यवाही करण्यात येणार आहे याबाबतचा लेखी अहवाल प्रथम अपिलिय अधिकारी डॉ. दिपा भोसले, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), काळ प्रकल्प क्र. २ माणगाव यांनी पुढील सुनावणीस स्वत: उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च: सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२६.२.२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

कोंकण भवन, **(शेखर चन्ने)**
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४. **राज्य माहिती आयुक्त,**
दिनांक : ३ डिसेंबर, २०२५ **कोंकण खंडपीठ**

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
**प्रथम अपिलिय अधिकारी डॉ. दिपा भोसले,**
**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), काळ प्रकल्प क्र. २ माणगांव यांचे कार्यालय,**
**ता.माणगांव, जि.रायगड.**

**अपिल क्रमांक : के.आर- ३६९३/२०२२**

**अपिलार्थी, श्री.निलेश नारायण पाटोळे,**

**सुनावणी दिनांक २६.२.२०२६** ( In Continuation of order dt.३.१२.२०२५)

**विवेचन**

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी डॉ. दिपा भोसले, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), काळ प्रकल्प क्र. २ माणगांव हे उपस्थित आहेत.

या प्रकरणी विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी डॉ. दिपा भोसले, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), काळ प्रकल्प क्र. २ माणगांव यांनी असे निवेदन केले की, भूसंपादन झालेल्या जमिनीचे ७/१२ उतारे उपलब्ध नसल्याने त्यासंबंधीची तक्रार आपण पोलीस स्टेशनमध्ये दाखल करू व त्याबाबतचा अहवाल आयोगास सादर करू. त्यांच्या या निवेदनाची नोंद घेण्यात आली. प्रस्तुत प्रकरण विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी डॉ. दिपा भोसले यांच्या लेखी अहवालाकरीता ठेवण्यात येत आहे. प्रस्तुत प्रकरणी पुनश्चः सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

**प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१६.४.२०२६ रोजी दुपारी १.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २६ फेब्रुवारी, २०२६

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
**प्रथम अपिलिय अधिकारी डॉ. दिपा भोसले,**
**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), काळ प्रकल्प क्र. २ माणगांव यांचे कार्यालय,**
**ता.माणगांव, जि.रायगड.**

**अपिल क्रमांक : के.आर- ३६९३/२०२२**

**अपिलार्थी, श्री.निलेश नारायण पाटोळे,**

**सुनावणी दिनांक १६.४.२०२६** ( In Continuation of order dt.२६.२.२०२६)

**विवेचन**

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.युवराज पांडुरंग कोदे, सेवानिवृत्त, शिरस्तेदार, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) काळ प्रकल्प क्र.२, माणगांव आणि विद्यमान प्रथम अपिलिय अधिकारी डॉ. दिपा भोसले, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), काळ प्रकल्प क्र. २ माणगांव हे उपस्थित आहेत.

या प्रकरणी डॉ. दिपा भोसले, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), काळ प्रकल्प क्र. २ माणगांव यांनी त्यांचा लेखी अहवाल आयोगास सादर केला. त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, आयोगाच्या सुनावणीतील सूचनेनुसार, महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख कायदा, २००५ अंतर्गत शिरस्तेदार तथा जन माहिती अधिकारी यांनी कंत्राटी कर्मचारी यांचेविरूध्द एफ. आय. आर. क्र.६१/२०२६ दाखल करण्यात आलेली आहे. तसेच एस. आर. क्रमांक ४४ नाणारेचे निवाडा पत्रक आणि ७/१२ तहसिलदार माणगाव यांच्याकडून प्राप्त करून घेऊन ती अपिलार्थी यांना स्पीड पोस्टाने दि.६.३.२०२६ रोजी पाठविण्यात आली आहे.

डॉ. दिपा भोसले यांच्या या अहवालाच्या अनुषंगाने या प्रकरणी कार्यवाही पूर्ण झाली असल्याने प्रस्तुत प्रकरणी आयोग पुढील आदेश देत आहे.

## आदेश

प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(शेखर चंद्रे)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १६ एप्रिल, २०२६

राज्य माहिती आयोग,
कोंकण खंडपीठ